पोपट

इटलीतील लोककथा








लेखन: लाल्झलो गल,
रफाएला गल.

मराठी अनुवाद: सुशील मेन्सन.






कोणे एके काळी एका प्राचीन राज्यातील एका गावात एक व्यापारी आणि त्याची सुंदर मुलगी राहात होते.





गावाजवळ एक उंच टेकडी होती. टेकडीच्या माथ्यावर एका वृद्ध राजाचा महाल होता. राजा वृत्तीने दुष्ट होता. त्याला सुंदर मुली खूप आवडत असत. व्यापाऱ्याच्या मुलीचे ओझरते दर्शन घेण्यासाठी तो नेहमी दुर्बीणीतून त्यांच्या घराकडे पाहात असे.

परंतु शेजारच्या राज्यातील एका तरूण राजपुत्राचे तिच्यावर प्रेम बसले होते. वृद्ध राजाच्या मनात काही दुष्ट योजना शिजत आहे, असा त्याला संशय आला. त्यामुळे व्यापाऱ्याच्या मुलीवर देखरेख ठेवण्यासाठी तो गावात येऊन राहू लागला.



एकदा राजुत्राला कळले की व्यापारी आपला माल विकण्यासाठी परदेशी जाणार आहे. त्या काळात त्याची मुलगी इथे एकटीच असणार आहे. त्याला फार काळजी वाटू लागली, व्यापारी निघून गेल्यावर दुष्ट राजा काय करेल?

राजपुत्राने फार विचार केला. शेवटी त्याने एक योजना आखली.

तो गर्द जंगलात एका चेटकिणीला भेटायला गेला.

"तू मला माझ्या इच्छेनुसार पोपट बनण्याची जादू शिकवशील का?" त्याने विचारले.

"अवश्य शिकवीन," चेटकीण म्हणाली. तिने राजपुत्राला पोपट बनायला शिकवले.




राजपुत्राने स्वत;ला पोपट बनवले आणि उडत तो व्यापाऱ्याच्या घराकडे गेला. व्यापाऱ्याच्या मुलीने खिडकीबाहेर, पेअरच्या झाडाच्या फांदीवर बसलेला पोपट पाहिला आणि खिडकी उघडली. लगेच पोपट घरात शिरला आणि गोष्टी सांगून मुलीची करमणूक करू लागला.

जसजसा तो गोष्ट सांगू लागला, तसतशी मुलगी अधिकाधिक गोष्टी ऐकण्यास आतुर झाली. शेवटी पोपट म्हणाला, “तू मध्येच अडवणार नसशील, तर मी तुला जगातील सर्वात नवलाईची गोष्ट सांगेन. पण माझ्या गोष्टीत कुणाचीही, कुठलीही बाधा येणार नाही, हे बघ. नाहीतर, मी निघून जाईन आणि तुला गोष्टीचा शेवट कधीच कळणार नाही.”

त्याचवेळी दरवाजावर मोठ्या आवाजात ठकठक झाली. दुष्ट राजाने मुलीला आणण्यासाठी शिपाई पाठवले होते. पण तिने सांगितले की ती खूप कामात आहे. कितीही मोठी व्यक्ती असली तरी भेटायला तिच्याकडे वेळ नाही. मग पुन्हा स्थिरावत तिने पोपटाला गोष्ट सांगण्याची विनंती केली.





"व्वा! छान!" पोपट म्हणाला. "पण मध्येच अडवू नकोस."

कोणे एके काळी एक राजा होता. त्याला तुझ्याएवढीच सुंदर मुलगी होती. तिला कुणी भावंडे नव्हती. म्हणून राजाने राज्यातल्या सर्वात कुशल कारागिरांना आणि कलाकारांना हुबेहूब राजकुमारीसारखी दिसणारी एक बाहुली बनवण्याचा आदेश दिला.

काही महिन्यांनंतर, राजासमोर एक विलक्षण कलाकृती सादर करण्यात आली. हुबेहूब राजकुमारीसारखी दिसणारी ती एक बाहुली होती. इतकी सुंदर भेट मिळाल्यावर राजकुमारी अतिशय आनंदीत झाली. ती बाहुलीला सर्वत्र आपल्यासोबत नेऊ लागली.






त्या राज्याच्या सीमेवर अतिशय गर्द आणि अमर्याद भासणारे जंगल होते. या काळोख्या जंगलात लुटारुंचा एक दुष्ट सरदार आपल्या टोळीसोबत राहात होता. लोक त्याला सैतानांचा राजा म्हणत.

दीर्घ काळापासून, हा लुटारू सरदार तरूण राजकुमारीला पळवून आणण्याची योजना आखत होता. एकदा राजा महाल सोडून दूरवरच्या भागाचा दौरा करण्यासाठी गेला. लुटारुंच्या सरदाराला हवी तशी संधी चालून आली.

ठक्, ठक्, ठक्.

“थांबू नकोस, सांगत राहा,” मुलगी पोपटाला म्हणाली. “मी तुम्हाला सांगितले होते ना, माझ्याकडे वेळ नाही म्हणून,” मुलगी शिपायांना म्हणाली.







लुटारुंच्या राजाने त्याच्या दोन गुंडांना महालात एकटीच असलेल्या राजकुमारीचे अपहरण करून आणण्याचा आदेश दिला. रात्र झाल्यावर ते गुंड राजकुमारीच्या खोलीत शिरण्यासाठी महालाची भिंत चढू लागले.

राजकुमारी निजण्याची तयारी करत होती. तिने आपली बाहुली खुर्चीवर ठेवली आणि आंघोळीसाठी निघून गेली. ते दोन्ही गुंड तिच्या खोलीत आले. खोलीत मंद प्रकाश होता. त्यांनी बाहुली उचलली आणि दोराच्या सहाय्याने लगेच खाली आले.





"बस, इतकीच आहे गोष्ट? याच्यानंतर काय झालं, सांग ना," व्यापाऱ्याची मुलगी उतावीळ होत म्हणाली.

पोपट पुढे सांगू लागला.

ते गुंड रात्रभर घोड्यावरून दौडत राहिले. पण सकाळ होताच त्यांना उमगले की त्यांनी राजकुमारी समजून बाहुली आणली होती. आता आपला सरदार खूप संतापेल, या विचाराने ते घाबरले. त्यांनी बाहुली रस्त्याकडेला टाकून पळ काढला.

नंतर एक राजपुत्र आपल्या घोड्यावर स्वार होऊन त्याच रस्त्याने जाऊ लागला. त्याने ती सुंदर बाहुली पाहिली आणि तिला उचलून आपल्या महालात घेऊन आला.






ठक्! ठक्! ठक्!

दारावर जोरजोरात आवाज होऊ लागला. मुलीने पुन्हा शिपायांना पिटाळून लावले.

“पुढे सांग,” ती पोपटाला म्हणाली. “थांबू नकोस. माझी उत्कंठा वाढलीय.”

“ठिकाय,” पोपट म्हणाला, “पण परत अडथळा आला, तर मला थांबावं लागेल.”



जेव्हा राजकुमारीचे वडील परतले तेव्हा त्यांना उमगले की लुटारू त्यांच्या मुलीचे अपहरण करू इच्छित होते. आपल्या मुलीला यापुढे कधीही एकटे सोडून जायचे नाही, हे त्यांनी मनाशी ठरवले.

पुढल्या वेळी ते दौऱ्यावर गेले तेव्हा त्यांनी मुलीला सोबत नेले. दौरा खूप दीर्घ आणि कष्टप्रद होता, म्हणून, ते एके ठिकाणी विश्रांतीसाठी थांबले. त्या जंगलातील जमिनीवर सुंदर सुंदर फुलांचा सडा पडला होता. राजकुमारी त्यांच्या सुवासावर आणि रंगांवर भाळली. ती स्वतःला रोखू शकली नाही. तिचे वडील झोपेत असताना ती फुले गोळा करू लागली. फुले गोळा करत करत ती आपल्या बग्गीपासून खूप दूर निघून गेली.

राजकुमारी परतली तेव्हा तिला बग्गी उलटलेली दिसली. तिचे वडील आणि सेवक गायब झाले होते.

विचलित होऊन ती वडिलांचा शोध घेण्यास निघाली. ती जंगलात अनेक दिवस भटकत राहिली. बोरे, काजू आणि जंगली अळंबी खाऊन तिने आपली भूक भागवली.

एके रात्री एका खडकाच्या आडोशाला झोपत असताना तिला काही आवाज ऐकू आले. थोड्या दूरवर तिला आग जळताना दिसली. ती चाचपडत त्या आगीजवळ जाऊ लागली. तिथे पोहोचताच तिला पाच भयानक....

धडाम! धडाम! धडाम! दारावर आवाज आला.

“अरे देवा, त्यांना जायला सांग आणि मला पुढची गोष्ट सांग,” मुलीने आर्जव केले.









राजकुमारीला तिथे पाच भयानक चेटकिणी दिसल्या. त्या धगधगत्या आगीवर ठेवलेल्या भांड्यात काहीतरी भयंकर शिजवत होत्या. मध्येच त्या डोमकावळ्यासारख्या कर्कश्श आवाजात किंचाळत, तेव्हा साप आणि बेडके त्या भांड्यात येऊन पडत.

"मंत्र हवा. राजपुत्राला मारण्यासाठी."

"कुठे मिळेल हा राजपुत्र, भगिनींनो?" एका चेटकिणीने विचारले.

"आम्हाला तो त्याच्या खोलीत सापडला. एका बाहुलीच्या प्रेमात वेडा झाला होता," दुसरी चैटकीण म्हणाली. "आम्ही त्याला त्याच्या महालाखाली असलेल्या तळघरात बंद केलंय. तळघरात जाण्याचा रस्ता त्याच्या बिछान्याखालून आहे." आणि त्या सगळ्या खी-खी करून हसू लागल्या.






राजकुमारी गुपचुप तिथून निघून गेली. रात्रभर ती घोड्यावरून दौडत राहिली. क्षितीजावर सूर्य उगवला तेव्हा ती जंगलापासून खूप दूर आली होती. दुपारपर्यंत ती एका मोठ्या शहराच्या प्रवेशद्वारावर पोहोचली. तेथील प्रत्येक घराच्या खिडकीत काळा झेंडा फडकत होता.

राजकुमारी एका बेकरीत पाव घेण्यास गेली. "राजपुत्र गायब झाले आहेत. आम्हाला वाटतं, त्यांचा मृत्यू झाला असावा," बेकरीवाल्याची पत्नी म्हणाली.

हे ऐकल्यावर राजकुमारी थेट महालात गेली.

"मला आत जाऊ दे," तिने शिपायांना विनंती केली. "माझ्याकडे राजपुत्राविषयी एक महत्त्वाची माहिती आहे."





राणी आणि तिचे शिपाई राजपुत्राला शोधण्यास धावले. त्या मुलीने सांगितले होते तिथेच राजपुत्र सापडला. त्यांनी त्याची सुटका केली. पण त्याला त्याची पर्वा नाही, असे दिसले. तो हालचाल न करता बसून एकटक बाहुलीकडे पाहात राहिला. राणी काही बोलतेय, करतेय याने त्याला काहीच फरक पडला नाही.

निराश होऊन राणी बाहुलीकडे बारकाईने पाहू लागली. ती हुबेहूब राजपुत्राचा ठावठिकाणा सांगणाऱ्या त्या अनोळखी मुलीसारखी दिसत होती.

“पळा आणि त्या मुलीला शोधून आणा,” तिने आदेश दिला.

राजकुमारी आपल्या वडिलांचा शोध घेण्यास निघत होती, त्याचवेळी शिपायांनी तिला शोधून काढले. शिपाई तिला राजपरिवारासमोर घेऊन आले त्याक्षणी राजपुत्र मंत्राच्या परिणामातून बाहेर आला.

“तूच ती, जिच्यावर माझं प्रेम जडलंय,” राजपुत्र म्हणाला. “माझ्याशी लग्न करशील?”

“पण मला आधी माझ्या वडिलांचा शोध घ्यायला हवा,” राजकुमारी दुःखद स्वरात म्हणाली.



त्याच वेळी ठक्! थाड्! धडाम्! दारावर आवाज झाला.

मुलगी गोष्टीचा शेवट ऐकण्यास आतुर होती. पण पोपटाची कल्पनाशक्ती कमजोर होऊ लागली. दुष्ट राजाकडून मुलीचे अपहरण आपण रोखू शकणार नाही, असे भय त्याला वाटू लागले.

थाड् ! थाड् ! थाड् ! दारावर घोड्यांचे आणि माणसांचे आवाज येऊ लागले.

“ठिकाय,” भीतीने पोपट तोतरे बोलू लागला.



राणी आणि राजपुत्र यांनी राजकुमारीसोबत तिच्या वडिलांचा शोध घेण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर त्यांचे लग्न झाले आणि दोघे सुखात राहू लागले.



अचानक दारावर कुणाचीतरी हाक ऐकू आली.

"मी तुझा पिता आहे. मला आत घेणार नाहीस का?" "

मुलगी दाराकडे धावली. तिचे वडील दौऱ्यावरून परतले होते.

"बाबा तुम्ही!" ती उद्गारली. "एक अत्यंत चमत्कारीक पोपट मला एक अद्भुत गोष्ट सांगतोय. बरेच दिवस गोष्ट सुरू आहे. पोपट गोष्ट सांगत असताना मध्येच मी अडथळा आणला तर तो गोष्ट थांबवतो. त्यामुळे तुम्ही दौऱ्यावर असेपर्यंत दारावर कुणीही ठकठक केली तरी मी दार उघडलं नाही. आत या आणि बघा किती अद्भुत पक्षी आहे तो!"




पण खोलीत एक देखणा पुरुष उभा होता. पोपट गायब झाला होता.

“मला माफ करा,” तो मुलीला म्हणाला. “दुष्ट राजाने तुझे अपहरण करण्याची योजना बनवली होती.” आपण राजपुत्र आहोत आणि तिला दुष्ट राजापासून वाचवण्यासाठी पोपट बनलो होतो, हे गुपीत त्याने उघड केले.

“शिवाय,” तो म्हणाला, “मला आशा आहे की तू माझ्याशी लग्न करशील.”

“मी तुला माफ केलं,” मुलगी हसत म्हणाली. “गोष्ट सांगण्याचं उत्तम कौशल्य असलेल्या तुझ्यासारख्या राजपुत्राशी लग्न करायला मी नकार कसा देईन?”

आणि अशा प्रकारे या गोष्टीचा शेवट झाला तसेच दुसऱ्या गोष्टीचासुद्धा.



समाप्त

